## मॅन्युअल क्र.15

## माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असलेल्या किंवा त्याच्याकडे असलेल्या माहितीच्या संबंधातील तपशील.

❖ विभागाचे संकेतस्थळ - **www. igrmaharashtra.gov.in**

❖ गेल्या काही वर्षांमध्ये विभगामध्ये दस्त नोंदणी प्रक्रीयेत आमुलाग्र बदल केले आहेत. सन 2002 पासून दस्त नोंदणीसाठी संगणकीकृत प्रणालीचा (SARITA) वापर सुरु करण्यात आला सन 2012 पासून संगणकीकृत दस्त नोंदणी प्रणाली मध्यवर्ती पध्दतीने (i- SARITA) सुरु करण्यात आली. तसेच ई-पेमेंट व ई-सर्च यासरख्या विविध ई-उपक्रमांची अंमलबजावणी सुरु करण्यात आली. महाराष्ट्र राज्याने नोंदणी अधिनियम,1908 चे कलम 34 ,35 व 69 मध्ये योग्य त्या सुधारणा करुन तसेच महाराष्ट्र ई-रजिस्ट्रेशन व ई-फायलिंग नियम 2013 विहीत करुन सन 2014 पासून दस्तऐवज नोंदणीसाठी ई-रजिस्ट्रेशन सुविधा नागरिकांना त्यांचे सदनिकेच्या पहिल्या विक्रीच्या व लिव्ह अॅन्ड लायसन्सचा दस्तऐवज नोंदणीसाठी ऑनलाईन सादर करता येतो. दुय्यम निबंधक यांना या प्रणालीव्दारे प्राप्त झालेला दस्तऐवज तपासून त्याची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने पुर्ण करण्यता येते. विकसकांना आणि नागरिकांना दुय्यम निबंधक कार्यालयात न येता दस्तऐवज नोंदणीची सर्व प्रक्रीया ऑनलाईन करता येत असल्यामुळे या सुविधेस राज्यातील नागरिकांकडून मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळालेला आहे.

❖ ई-अभिनिर्णय - अगोदर दस्तऐवजांचे अभिनिर्णय करण्यासाठी नागरिकांना सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये वारंवार जावे लागत होते. परंतु आता अभिनिर्णयासाठी सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात न येता ऑनलाईन ई-अभिनिर्णय ही प्रणाली सुरु करण्यात आल्याने नागरिकांना घरी बसुन सदर सुविधेचा लाभ घेता येत आहे. नागरिकांना ऑनलाईन पध्दतीने प्रकरणे अभिनिर्णयासाठी दाखल करता येऊ लागली आहेत व सदर प्रकरणांची स्थिती सुध्दा पाहता येऊ लागली आहे. ही प्रणाली सुरु करुन गतिमान व लोकाभिमुख प्रशासनाचे ध्येय साध्य करण्याच्या दृष्टीने शासनाने पाऊल उचलले आहे.

❖ जनतेच्या सोईसाठी सन 2013 पासुन ई-पेमेंट (e-Payment)- ई.एस.बी.टी.आर (e-SBTR), या आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन अधिक सुरक्षित, गतिमान, लोकाभिमुख आणि पडताळणीसाठी सोईस्कर प्रणाली विकसीत केलेली आहे व ही सुविधा सध्या राज्यात सर्वत्र चालु आहे. सदर व्यवस्था अधिक सुरक्षीत व कमी खर्चाची आहे. या

विभागाने व्यापक जनहित व सर्वसामान्य माणुस केंद्रबिंदु धरुन आणि राष्ट्र हिताच्या दृष्टीकोणातुन आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन ही प्रणाली विकसित करण्यात आली आहे. त्यामुळे सर्व सामान्य नागरीक आता घरबसल्या सदर प्रणालीचा अवलंब करुन मुद्रांकाविषयची आपली कामे करु लागलेली आहेत. या पदधतीमुळे केव्हाही कोठुनही 24x7 ग्रास (GRAS) प्रणाली अथवा शासनाने प्राधिकृत केलेल्या बँका व्दारे मुद्रांक शुल्क, नोंदणी फी अथवा इतर रकमांचा भरणा शासनास करता येतो. त्यामुळे राज्यातील जनतेने देखील या प्रणालीचा स्विकार केला असून एकूण महसुलाच्या 97% पेक्षा जास्त महसुल ई-पेमेंट प्रणालीद्वारे जमा होतो. तसेच सदर प्रणालीमध्ये आणखी सुटसुटीतपणा यावा व त्याचा राज्यातील जनतेला आणखी लाभ घ्याता यावा याकरिता यामध्ये आणखी सुधारणा कशा करता येतील याबाबत कार्यवाही चालु आहे.

❖ ई- फ्रॅकिंग - सामान्य नागरिकांना सहज व सुलभ कमी रकमेचे मुद्रांक शुल्क उपलब्ध होण्यासाठी Online Franking ची सुविधा सुरु करण्यात आलेली आहे. यामध्ये जास्तीत जास्त Banking and Non Banking Financial Institutions यांना परवाना देण्याचे काम प्रगतीपथावर आहे. त्यामुळे पारदर्शकता येऊन शासनाचे कामात गतिमानता आली आहे.

❖ राज्यात नोंदणीसाठी सादर करावयाच्या दस्तांसाठी मुद्रांक लावण्याकरीता मुद्रांक पेपर (रु.500/- पर्यंत) फ्रॅकिंग (रु.5000/- पर्यंत), मुद्रांक जिल्हाधिकारी यांचे अभिनिर्णय प्रमाणपत्र, ई-एसबीटीआर व ई-चलन ही माध्यमे उपलब्ध आहेत. तसेच नोंदणी न करावयाच्या दस्तांसाठी वरील पैकी ई-चलन वगळून सर्व पर्याय उपलब्ध आहेत. त्याशिवाय संस्थात्मक संरचना जसे की, डिलिव्हरी ऑर्डरसाठी सेवा केंद्रामार्फत, विमा कंपन्यांसाठी एकत्रित मुद्रांक शुल्क तर बँका व इतर वित्तीय संस्थासाठी कलम 10ड सारखी ऑनलाईन प्रणाली माध्यमे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. या माध्यमांमुळे (विशेषतः एकत्रित मुद्रांक शुल्क व कलम 10ड मुळे) शासनाचा महसूल कोणत्याही मध्यस्थांशिवाय GRAS (Government Receipt Accounting System) मार्फत शासनास थेट जमा होणे शक्य झाले असुन शासन महसुलात वृध्दी झालेली आहे.